**ठळक बातम्या**

- पाच विधानसभा निवडणुकांची मतमोजणी सुरु/ सुरुवातीच्या कलांनुसार पश्चिम बंगाल आणि आसामात भाजपा आघाडीवर,
  तमिळनाडूमधे नवोदित टीव्हीकेची बाजी,
  केरळमधे काँग्रेस प्रणित यू डी एफची बहुमताकडे वाटचाल,
  तर, पुदुच्चेरीत स्थानिक एआय एनआरसीला सर्वाधिक जागा

- महाराष्ट्रात बारामतीच्या पोटनिवडणुकीत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार तर राहुरीत भाजपाचे अक्षय कर्डिले आघाडीवर

**आणि**

- पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावर सीमाशुल्क विभागानं केलेल्या कारवाईत मोठ्या प्रमाणावर अंमली पदार्थ जप्त

**<><><><><>**

केरळ, आसाम, तमिळनाडू, पश्चिम बंगाल या राज्यांमधल्या आणि पुद्दुचेरी या केंद्रशासित प्रदेशातल्या विधानसभा निवडणुकांची मतमोजणी सुरू आहे.

आतापर्यंत आलेल्या कलानुसार, **पश्चिम बंगालमध्ये** तीन वेळा सत्ता मिळवलेला तृणमूल काँग्रेस पक्ष पिछाडीवर असून भाजपने बहुतांश जागांवर आघाडी घेतली आहे. एकूण २९४ मतदार संघांपैकी
भारतीय जनता पक्षाला १८८ जागांवर
तर तृणमूल काँग्रेसला ९२ जागांवर आघाडी मिळाली आहे.

**तमिळनाडू**मध्ये एकूण २३४ मतदारसंघांपैकी तमिळगा वेत्री कळघम हा अभिनेता जोसेफ विजय यांचा पक्ष ११० जागांवर
तर अण्णा द्रमुक ५७ आणि द्रमुक ४८ जागांवर आघाडीवर आहे.

**केरळात** १४० मतदार संघांपैकी
काँग्रेस प्रणित यूडीएफ ६१ जागांवर

तर मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष प्रणित एलडीएफने एक ठिकाणी विजय मिळवला असून २६ जागांवर आघाडी घेतली आहे.

**आसाममध्ये** १२६ मतदारसंघांपैकी
भारतीय जनता पक्षाला ७९ जागांवर
काँग्रेस २४ जागांवर आघाडी मिळाली आहे.

**पुद्दुचेरीत** एकूण ३० मतदारसंघांपैकी
ऑल इंडिया एन. आर. काँग्रेस पक्षाला ४ जागांवर विजय मिळाला असून १ जागेवर आघाडी मिळाली आहे. तर भाजपला एका जागेवर विजय मिळाला असून एका जागेवर आघाडी मिळाली आहे. काँग्रेस, अण्णा द्रमुक आणि द्रमुकला प्रत्येकी एका जागेवर विजय मिळाला आहे.

**<><><><><>**

आजच्या निकालांमधे भारतीय जनता पार्टीला मोठ्या प्रमाणात यश मिळताना दिसत आहे. आतापर्यंत आलेल्या कलानुसार भाजपाने पश्चिम बंगाल आणि आसाममधे बहुमताचा आकडा पार केला आहे. पश्चिम बंगालमधे २०२१ च्या विधानसभा निवडणुकीच्या तुलनेत भाजपाच्या मताधिक्यात मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून ४४ टक्के मतं मिळवत भाजपा १७४ जागांवर आघाडीवर आहे. या निवडणुकीत भाजपाची मतांची टक्केवारी आणि जागा दोन्हीत लक्षणीय वाढ झाली आहे. दुसरीकडे सत्ताधारी तृणमूल काँग्रेसला मात्र मोठा फटका बसल्याचं दिसत आहे. हे कल कायम राहिले तर तृणमूल काँग्रेसच्या पंधरा वर्षांची सत्ता संपुष्टात येऊन बंगालमधे भाजपाच्या सत्तास्थापनेचा मार्ग मोकळा होईल.

आसाममधे सत्ताधारी भाजपाला मतदारांनी पुन्हा एकदा पसंती दिल्याचं सुरुवातीचे काल सांगत आहेत. ७९ जागांवर आघाडी मिळवत भाजपा पहिल्या क्रमांकाचा पक्ष बनण्याकडे मार्गक्रमण करत आहे.

तमिळनाडू विधानसभा निवडणुकीत भाजपा अण्णा द्रमुकसह निवडणूक लढवत आहे. इथे विजय यांचा टीव्हीके पक्ष आघाडीवर असून सत्ताधारी द्रमुक तिसऱ्या स्थानावर फेकला गेला आहे. अण्णा द्रमुक आणि भाजपा आघाडी दुसऱ्या स्थानावर आहे. केरळमधे भाजपाने आपली अकरा ते बारा टक्के मतं कायम राखल्याचं आतापर्यंतच्या कलांमधे दिसत आहे. याठिकाणी भाजपा दोन जागांवर आघाडीवर असून ही आघाडी कायम राखली तर केरळ

विधानसभा निवडणुकीत भाजपा पुन्हा एकदा प्रवेश मिळवण्यात यशस्वी होईल. पुद्दुचेरीमधेही भारतीय जनता पार्टीचे मित्र पक्ष एन आर काँग्रेससह अकरा जागांवर आघाडीवर आहे.

भाजपा पश्चिम बंगालमधे ऐतिहासिक विजयाकडे वाटचाल करत आहे, अशी प्रतिक्रिया भाजपा प्रवक्ते शहजाद पुनावाला यांनी दिली आहे. ते आकाशवाणीशी बोलत होते.

**- - होल्ड- पुनावाला बाईट- - -**

हे सुरुवातीचे कल असून संपूर्ण चित्र लवकरच स्पष्ट होईल, असं काँग्रेस प्रवक्ता पवन खेरा म्हणाले. त्यानंतरच काही मत मांडता येईल असं ते म्हणाले.

**- होल्ड - खेरा बाईट - -**

**<><><><><>**

या निवडणुकीत अनेक दिग्गज नेत्यांचं भवितव्य आजच्या निकालाने ठरणार आहे. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी भवानीपूर मतदारसंघातून त्यांचे प्रतिस्पर्धी भाजपा नेते सुवेंदु अधिकारी यांच्यापेक्षा १९ हजार ३९२मतांनी आघाडीवर आहेत. अधिकारी नंदीग्राम मतदारसंघातूनही निवडणूक लढवत असून तिथून ते आघाडीवर आहेत. काँग्रेस नेते अधीररंजन चौधरी हे बेहरामपूर मतदारसंघातून सध्या ४ हजार मतांनी पिछाडीवर आहेत. तर खरगपूर सदर इथून भाजपाचे ज्येष्ठ नेते दिलीप घोष ९ हजार मतांनी आघाडीवर आहेत. आर जी कार प्रकरणातल्या पीडितेची आई आणि भाजपा उमेदवार रत्ना देबनाथ या पानीहाती मतदारसंघातून ५ हजार मतांनी पुढे आहेत.

तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम के स्टॅलिन हे कोलातूर मतदारसंघातून ८ हजार मतांनी पिछाडीवर असून इथून टिव्हीकेचे व्ही एस बाबु आघाडीवर आहेत. उपमुख्यमंत्री उदयनिधी स्टॅलिन हे परऊर मतदारसंघातून आघाडीवर आहेत. तर टिव्हीकेचे अध्यक्ष जोसेफ विजय यांनी तिरूचीरपल्ली आणि पेरम्बूर या दोन्ही मतदारसंघातून आघाडी घेतली आहे. तर अण्णा द्रमुकचे नेते माजी मुख्यमंत्री पलानीस्वामी हेही आघाडीवर आहेत.

केरळमधे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष प्रणित डावी आघाडी पिछाडीवर असली तरी मुख्यमंत्री पिनरायी विजयन हे त्यांच्या धर्मदाम मतदारसंघातून ९व्या फेरी अखेर आघाडीवर आहेत. तर आरोग्य मंत्री विणा जॉर्ज या पिछाडीवर आहेत. माजी आरोग्य मंत्री के शैलजा याही पेरवून मतदारसंघातून ५ हजार मतांनी पिछाडीवर आहेत. तर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष व्ही डी सतीशन हे परावूर मतदारसंघातून ९ हजार मतांनी आघाडीवर आहेत.

**<><><><><>**

महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, नागालँड आणि त्रिपुरा विधानसभेच्या एकूण सात जागांसाठी पोटनिवडणुकीची मतमोजणीही आज होत आहे.

महाराष्ट्रात **बारामती** विधानसभा पोटनिवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सुनेत्रा अजित पवार आघाडीवर असून **राहुरीत** भाजपाचे अक्षय कर्डिले आघाडीवर आहेत. बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत सुनेत्रा पवार यांचा विजय जवळपास निश्चित झाला आहे. मात्र, निकाल जाहीर झाल्यानंतर कोणत्याही प्रकारच्या विजयी मिरवणुका काढू नयेत असं आवाहन सुनेत्रा पवार यांनी आपल्या कार्यकर्ते आणि समर्थकांना केलं आहे. कर्नाटकात **बागलकोट** आणि **दावणगिरी दक्षिण** या दोन्ही ठिकाणी काँग्रेसचे उमेदवार आघाडीवर आहेत. गुजरातमध्ये उमरेठ, नागालँडमध्ये कोरिडांग आणि त्रिपुरात धर्मनगर या तिन्ही जागी भाजपचे उमेदवार आघाडीवर आहेत.

**<><><><><>**

भारताच्या उत्पादन क्षेत्रात नवीन व्यवसायाची आवक आणि उत्पादन वाढीत सुधारणा झाली असून या वाढीचा वेग मंदावला असल्याचं 'HSBC इंडिया मॅन्युफॅक्चरिंग परचेसिंग मॅनेजर्स इंडेक्स'च्या अहवालात म्हटलं आहे. भारताचा उत्पादन क्षेत्रातला निर्देशांक मार्चमध्ये ५३ पूर्णांक ९ दशांश टक्क्यांवर होता, तो वाढून एप्रिलमध्ये ५४ पूर्णांक ७ दशांश टक्क्यापर्यंत वाढला आहे. मात्र, ही सुधारणा अत्यंत संथ गतीने सुरू आहे. वाढीचा हा वेग गेल्या चार वर्षांतला दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मंद वेग आहे, असं या अहवालात म्हटलं आहे. मागण्यांचा ओघ, रोजगार, पुरवठादारांच्या वितरणाचा कालावधी आणि खरेदी केलेल्या साठ्याचं प्रमाण या घटकांच्या आधारे हा निर्देशांक तयार केला जातो.

**<><><><><>**

पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावर सीमाशुल्क विभागानं केलेल्या कारवाईत मोठ्या प्रमाणावर अंमली पदार्थ जप्त करण्यात आले असून, या प्रकरणी दोन जणांना अटक करण्यात आली आहे. बँकॉकहून पुण्यात आलेल्या एका प्रवाशाच्या सामानातून तीन किलो ३४८ ग्रॅम हायड्रोपोनिक गांजा जप्त करण्यात आला. त्याची अंदाजे किंमत एक कोटी १७ लाख रुपये आहे.

**<><><><><>**

माद्रिद खुल्या टेनिस स्पर्धेत अव्वल मानांकित यानिक सिन्नर ने काल अलेक्झांडर झ्वेरेवचा पराभव करुन पुरुष एकेरीचं विजेतेपद पटकावलं. मास्टर्स थाऊजंड स्पर्धा सलग पाचव्यांदा जिंकणारा तो पहिलाच खळाडू ठरला आहे.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज मुंबईत वानखेडे मैदानावर मुंबई इंडियन्सचा सामना लखनौ सुपर जायंट्सबरोबर होणार आहे. सामना संध्याकाळी साडेसातवाजता सुरु होईल.

अहमदाबादमधे काल झालेल्या सामन्यात गुजरात टायटन्सने पंजाब किंग्जचा ४ गडी राखून पराभव केला. हैद्राबादमधे कोलकाता नाईट रायडर्सने सनरायजर्स हैद्राबादला हरवून विजयी परंपरा कायम ठेवली.

<><><><><>

दिल्ली, हरयाणा, हिमाचल प्रदेश, पंजाब, उत्तरप्रदेश, आणि उत्तराखंडमधे आज वादळी पावसासह गारपिटीची शक्यता हवामानशास्त्र विभागानं व्यक्त केली आहे. जम्मू काश्मीर लदाख, झारखंड, मध्य प्रदेश आणि ओदिशात उद्यापर्यंत अशीच स्थिती राहील.

//<><><><><>//